**आदेश नि.क्र.०१अ खाली प्रमाणे**
(दिनांक २०.०१.२०२०)

१. प्रस्तुत अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम १२५ अंतर्गत अर्जदारांना अंतरिम पोटगी मिळण्याकरीता दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत अर्जासोबत दाखल मुळ अर्ज तसेच गैरअर्जदाराचा लेखी जबाब नि.क्र.०९ वाचला.

२. अर्जदारातर्फे अधिवक्ता श्री.व्ही.एस.पोळकट व गैरअर्जदारातर्फे अधिवक्ता कु. मुलमुले, यांचा युक्तीवाद ऐकला.

३. प्रस्तुत अर्ज व गैरअर्जदाराचा जबाब याचे अवलोकन केले असता हे दिसुन येते की, अर्जदार व गैरअर्जदार पती पत्नी आहेत व मुलगी नामे फैजा ही त्यांची अपत्य आहे व आज रोजी अर्जदार हे गैरअर्जदारापासुन वेगवेगळे राहत आहेत याबाबत दोन्ही पक्षांमध्ये दुमत नाही. अर्जदाराचे कथन असे आहे की, गैरअर्जदार व त्यांच्या परिवाराने अर्जदाराला शारिरीक व मानसिक त्रास दिला व तिला घराबाहेर हाकलुन दिले त्यामुळे सरतेशेवटी अर्जदाराला माहेरी येवुन राहावे लागले. त्यामुळे गैरअर्जदाराने हेतुपुरस्सरपणे तिची हेळसांड केली व तिला वागविण्यास नकार दिला.

४. उलटपक्षी, गैरअर्जदाराचे असे म्हणणे आहे की, अर्जदार ही लग्नानंतर गैरअर्जदाराच्या एकत्र कुटूंबात नांदावयास आली त्यानंतर काही दिवसांनंतरच तिने गैरअर्जदाराच्या नातेवाईकांसोबत राहायचे नाही व त्याला वेगळी भाडयाची खोल घेवुन राहण्यास सांगितले. त्या कारणावरुन अर्जदार, गैरअर्जदार व त्यांचे कुटूंबियामध्ये शुल्लक कारणावरुन भांडण तंटा करीत होती दुस–या दिवशी काही न सांगता तिचे माहेरी निघुत जात होती. त्यानंतर गैरअर्जदार अर्जदाराला समजावुन सांगून नांदण्यास आणत होता. त्यानंतर गैरअर्जदारा दुस–या मोहल्ल्यात भाडयाची खोली घेतली व तेथे अर्जदारासोबत वेगळा राहु लागला. परंतु अर्जदार तेथे सुध्दा काही महिने चांगली वागली. गैरअर्जदार तिच्या आवश्यक त्या वस्तु व गरजा पुर्ण करीत होता. त्यामुळे अर्जदाराला वाटले की, गैरअर्जदार हा तिच्या मुठीत आहे व तो माझे काहीही ऐकतो व तसेच करतो. त्यानंतर अर्जदाराने गैरअर्जदारा तिच्या माहेरी राहण्यास चल, तु ऐकले नाहीस तर मी माझ्या जिवाचे बरेवाईट करील व तुला व तुझ्या कुटूंबियांना खोटया केसेसमध्ये फसविल, अशी धमकी दिली. त्यानंतर गैरअर्जदार हा दुस–या दिवशी कामावर गेल्यानंतर अर्जदार तिच्या मुलीला घेवुन न सांगता तिच्या माहेरी निघुन गेली. त्यानंतर सुध्दा गैरअर्जदाराने अर्जदाराला परत नांदण्यास येण्याकरीता समजाविले परंतु तिने ऐकले नाही तसेच अर्जदाराच्या भावाने गैरअर्जदाराला तो मुर्तिजापुर येथे आल्यास हातपाय तोडुन टाकण्याची धमकी दिली व आता यानंतर कोर्टात पाहु, अशी धमकी दिली. गैरअर्जदार हा अर्जदाराला आज सुध्दा वागविण्यास तयार आहे. परंतु अर्जदाराने गैरअर्जदाराचा कोणतेही संयुक्तीक कारण नसतांना त्याग केला व त्याला वैवाहीक सुखापासुन वंचित केले. यासर्व कारणास्तव अर्जदाराचा अर्ज खारीज करण्याची विनंती गैरअर्जदाराने केली आहे.

५. अर्जदार व गैरअर्जदार यांचे कथन विचारात घेतले असता, अर्जदार स्वतःहुन घर सोडुन निघुन आली किंवा गैरअर्जदाराने तिचा सांभाळ करण्यास नकार दिला, त्यामुळे तिला माहेरी यावे लागले, याबाबी प्रस्तुत प्रकरणात साक्षपुरावा झाल्यानंतर सिध्द होतील. परंतु आज रोजी अर्जदारांना त्यांच्या दैनदिन गरजा भागविण्यासाठी प्रस्तुत केसचा अंतीम निकाल होईपर्यंत पोटगी रक्कमेची आवश्यकता असल्याचे दिसुन येते.

६. गैरअर्जदाराने अर्जदाराला ती तिच्या माहेरी राहत असल्यापासुन कोणतीही आर्थिक मदत केल्याचे दर्शविलेले नाही. गैरअर्जदार, त्याचे वडील व भाउ हे एकत्रीतपणे फेब्रिकेशनचे ठेकेदारी पध्दतीने काम करतो. तसेच तो लोखंडी कपाट, पलंग, सोफे दिवाण इत्यादी आत्याधुनिक वस्तु निर्माण करण्याची कला त्याला अवगत आहे. त्याद्वारे ते किमान दररोज १० हजार निव्वळ नफा कमवितात व त्यातुन १/३ रक्कम गैरअर्जदाराच्या वाटयाला येते. तसेच गैरअर्जदाराने तो परप्रातांत जाउन मजुरीचे काम करतो, असे सांगितले आहे. त्यामुळे गैरअर्जदारावर अर्जदारां व्यतिरिक्त इतर कोणाच्याही पालनपोषणाची जबाबदारी नाही, हे अर्जदार व गैरअर्जदाराच्या कथनावरुन दिसुन येते.

७. गैरअर्जदारावर कायदेशीरदृष्टया अर्जदाराचे पालनपोषण करण्याची नैतिक जबाबदारी आहे. अशा परिस्थितीत अर्जदाराने दरमहा रुपये १०,०००/– अंतरिम पोटगीची मागणी केलेली आहे. परंतु गैरअर्जदाराचे मासिक उत्पन्न लक्षात घेता, अर्जदार क्र.१ ला दरमहा अंतरिम पोटगी रुपये १,५००/– व अर्जदार क्र.२ ला दरमहा अंतरिम पोटगी रुपये १,०००/– मिळण्यास पात्र ठरते व सदर पोटगी रक्कम गैरअर्जदार हा अर्जदारांना सहजरित्या देउ शकतो. करीता आदेश खालील प्रमाणेः–

<u>आदेश</u>

१. अर्जदारांचा अर्ज अशंतः मंजुर करण्यात येतो.
२. गैरअर्जदाराने अर्जदारांना दरमहा रुपये २,५००/– (रुपये अडीच हजार फक्त) अंतरिम पोटगी प्रस्तुत अर्जाच्या दिनांका पासुन म्हणजे २६.०८.२०१९ पासुन पुढील आदेशापर्यंत देत राहावी.
२. प्रस्तुत आदेशाची प्रत अर्जदारांना विनामुल्य पुरविण्यात यावी.

Jyoti Bharat Goyal
Digitally signed by Jyoti Bharat Goyal
Date: 2020.01.23 12:26:22 +0530

(श्रीमती जे.बी.गोयल)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(न्या.क्र.१), मुर्तिजापुर.

मुर्तिजापुर.
दिनांक २०.०१.२०२०

<u>CERTIFICATE</u>

"I affirm that the contents of this PDF file judgment/order are same word for word as per original judgment"

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | P. B. Kute, |
| Court name | : | Smt. J.B.Goyal,<br>C.J. (J.D.) & JMFC, Murtizapur |
| Judgment date | : | 20/01/2020 |
| Judgment signed by<br>Presiding Officer on | : | 20/01/2020 |
| Judgment uploaded on | : | 20/01/2020 |

## CERTIFICATE

"I affirm that the contents of the PDF file judgment/order are same word for word as per original judgment/order"

Name of Steno : Shri P.B.Kute.
Court name : C.J. (J.D.) & JMFC, Murtizapur.
Date : 26.02.2018.
Judgment signed by
Presiding Officer on : 26.02.2018.
Judgment uploaded on : 26.02.2018.